सकाळ

पुणे, बुधवार, २६ जून २०१९



सातारा रस्ता : सिटी इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी विविध योगासने करून योग दिन साजरा केला.

# 'सिटी इंटरनॅशनल'मध्ये योग दिन उत्साहात

पर्वती, ता. २५ : सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी योग दिन उत्साहात साजरा केला. या वेळी औंध, वानवडी आणि सातारा रस्ता शाळेचे शिक्षकही सहभागी झाले होते. या वेळी ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन, हनुमान आसन, चंद्रासन, सुखासन अशी विविध प्रकारची योगासने शिक्षक व विद्यार्थ्यांनी केली. याप्रसंगी सातारा रस्ता शाळेच्या लीना भोसले, औंध शाळेच्या शिल्पा गुजरे, वानवडी शाळेच्या अर्चना क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना योगाचे जीवनातील महत्त्व समजावून सांगितले.